**दिव्यांग क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थांच्या (Instituitions) नोंदणी, देखरेख आणि नूतनीकरणासाठी मानक कार्यप्रणाली विहित करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**दिव्यांग कल्याण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक :- दिव्यांग-2025/प्र.क्र. 10/कार्यासन-1**
31,32,35 "ए" विंग, तिसरा मजला, मित्तल टॉवर
बॅरिस्टर रजनी पटेल मार्ग, नरिमन पॉईंट,
मंत्रालय, मुंबई - 400 021.
**दिनांक :- 17 ऑक्टोबर, 2025.**

**संदर्भ :-** 1. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, 2016.
2. दिव्यांग व्यक्ती हक्क नियम, 2017.
3. महाराष्ट्र राज्य दिव्यांग व्यक्ती हक्क नियम, 2024.

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र शासन दिव्यांग व्यक्तींची प्रतिष्ठा, हक्क आणि सुरक्षा यांचे संरक्षण करण्यास कटिबद्ध आहे. दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणात नागरिक, नागरी समाज संघटना/संस्था महत्वपूर्ण भूमिका बजावतात.

2. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, 2016 च्या कलम 49-53 अनुसार दिव्यांगांच्या कल्याण, विकास, पुनर्वसन आणि सक्षमीकरण क्षेत्रात काम करणाऱ्या नागरी समाज संघटनांची/संस्थांची नोंदणी अनिवार्य आहे. तथापि विभागाच्या असे निदर्शनास आले आहे कि, दिव्यांग क्षेत्रात अनेक नागरी समाज संघटना/संस्था अद्यपि वैध नोंदणी शिवाय कार्यरत आहेत. सदर बाब दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ च्या कलम ५० चे उल्लंघन करणारी आहे. कोणतीही व्यक्ती अथवा नागरी समाज संघटना/संस्था दिव्यांग क्षेत्रात वैध नोंदणी शिवाय कार्य करू शकत नाही.

3. दिव्यांग क्षेत्रात काम करणाऱ्या सर्व नागरी समाज संघटनांच्या/संस्थांच्या कामकाजात एकसमानता, येण्यासाठी तसेच त्यांची जबाबदारी आणि सेवांची गुणवत्ता सुनिश्चित करण्यासाठी, नागरी समाज संघटनांची/संस्थांची नोंदणी, तपासणी, देखरेख, नूतनीकरण, जबाबदारी व पारदर्शकता निश्चित करण्यासाठी कार्यप्रणाली (SOP) निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. या अनुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णयः-**

**1. सक्षम प्राधिकारी :**

दिव्यांग व्यक्तीं हक्क अधिनियम, 2016 च्या कलम 49 आणि महाराष्ट्र राज्य दिव्यांग व्यक्ती हक्क नियम, 2024 च्या नियम 5 अनुसार "आयुक्त, दिव्यांग कल्याण" यांना सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

**2. नागरी समाज संघटना/संस्था नोंदणीसाठी पात्रता निकष :**

2.1 आरोग्य, कौशल्य विकास, व्यावसायिक प्रशिक्षण, पुनर्वसन, संशोधन आणि विकास, शिक्षण-प्रशिक्षण इत्यादि बाबत दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरण, विकास व पुनर्वसनासाठी काम करणाऱ्या नागरी समाज संघटना/संस्था असणे आवश्यक आहे.

2.2 संस्था सोसायटी नोंदणी कायदा, 1860, बॉम्बे पब्लीक ट्रस्ट कायदा, 1950 किंवा कंपनी कायदा, 2013 (कलम 8) अंतर्गत नोंदणीकृत असणे आवश्यक आहे.

2.3 Articles of Association(AoA), Memorandun of Articles (MOA) किंवा By-Laws मध्ये दिव्यांग व्यक्तींचे सक्षमीकरण, प्रशिक्षण, संशोधन व विकास, आणि पुनर्वसन इत्यांदीशी संबंधीत उद्दिष्टांचा स्पष्ट उल्लेख असणे आवश्यक असून त्या क्षेत्रात कार्यरत असणे आवश्यक राहील.

2.4 पुरेसे पात्र कर्मचारी - भारतीय पुनर्वसन परिषदेच्या (RCI) निकषांनुसार आणि नागरी समाज संघटना/संस्था प्रभावीपणे आणि सुरळीतपणे चालवण्यासाठी आवश्यक असलेल्या निकषांनुसार किमान मानके पूर्ण करणे आवश्यक आहे. शासनाने वेळोवेळी दिलेले निकष व निर्देश नागरी समाज संघटनांनी/संस्थांनी पूर्ण करणे आवश्यक राहील.

2.5 शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सुगम्यतेबाबातचे तत्त्वे व मानके यांचे पालन करणे बंधनकारक राहील.

2.6 सदर नागरी समाज संघटना/संस्था दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, 2016 आणि केंद्रशासनाच्या दिव्यांग व्यक्ती हक्क नियम, 2017 व महाराष्ट्र राज्य दिव्यांग व्यक्ती हक्क नियम , 2024 नुसार पात्र असावी.

2.7 आर्थिक क्षमता - नागरी समाज संघटना/संस्था या क्षेत्रात काम करण्यासाठी आर्थिकदृष्ट्या सक्षम असणे आवश्यक आहे. मागील तीन वर्षांचे लेखापरीक्षणाची आर्थिक विवरणपत्रे सादर करणे अनिवार्य असेल. नागरी समाज संघटना/संस्था केवळ शासनाच्या निधीवर अवलंबून राहणारी नसावी तर स्वतःचे वित्तीय स्त्रोत असणे आवश्यक

असेल. स्वतःचे स्त्रोत/Corporate Social Responsibilty (CSR) इत्यांदी मधून मिळणाऱ्या निधीतूनकामकाज योग्यरीत्या चालविण्याकरिता नागरी समाज संघटना/संस्था सक्षम असावी.

**3. अर्ज प्रक्रिया :**

3.1 नागरी समाज संघटना/संस्था महाराष्ट्र राज्य दिव्यांग व्यक्ती हक्क नियम, 2024 च्या 6(2) च्या प्रपत्रामध्ये उल्लेखित आवश्यक कागदपत्रांसह अर्ज दिव्यांग कल्याण विभागाच्या जिल्हास्तरीय अधिकाऱ्याला सादर करतील. जिल्हास्तरीय अधिकारी जास्तीत जास्त 5 दिवसांच्या आत "आयुक्त, दिव्यांग कल्याण" यांच्याकडे सदर अर्ज सादर करतील.

3.2 अर्जांची प्राथमिक छाननी ही आयुक्त कार्यालयाकडून जास्तीत जास्त 15 दिवसात केली जाईल.

**4. छाननी आणि तपासणी :**

4.1 प्राथमिक छाननी झाल्यानंतर नागरी समाज संघटनांची/संस्थांची तपासणी जिल्हास्तरीय समिती मार्फत करण्यात येईल. जिल्हास्तरीय समितीमध्ये खालील अधिकाऱ्यांचा समावेश असेल.

अ. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद - अध्यक्ष.

आ. जिल्हा शिक्षण अधिकारी/जिल्हा आरोग्य अधिकार/संबंधित क्षेत्राशी संबंधित जिल्हास्तरीय अधिकारी-सदस्य

इ. दिव्यांग कल्याण विभागाचा जिल्हास्तरीय अधिकारी - सदस्य सचिव

4.2 जिल्हास्तरीय समिती नागरी समाज संघटनेचे/संस्थेचे परीक्षण करून परिपूर्ण अहवाल जास्तीत जास्त 30 दिवसात आयुक्तांना सादर करतील.

**5. नोंदणीला मान्यता :**

5.1 "आयुक्त, दिव्यांग कल्याण" जिल्हास्तरीय समितीचा अहवाल मिळाल्यापासून जास्तीत जास्त 30 दिवसांच्या आत अर्जावर निर्णय घेतील.

5.2 वैधता- नोंदणी प्रमाणपत्र सुरवातीला एका वर्षाच्या कालावधीसाठी दिले जाईल आणि प्रमाणपत्राचे नुतणीकरण करता येईल.

5.3 प्रत्येक नोंदणीकृत नागरी समाज संघटनेला/संस्थेला एक अव्दितीय संस्था आयडी (Unique ID No.) देण्यात येईल.

**6. नोंदणीचे नुतनीकरण :**

6.1 नोंदणी प्रमाणपत्राची मुदत संपण्यापूर्वी 60 दिवस अगोदर नुतनीकरणासाठीचा अर्ज परिच्छेद क्रमांक -3 प्रमाणे "आयुक्त, दिव्यांग कल्याण" याना सादर करणे आवश्यक राहील.

6.2 नुतणीकरणाची किमान मानके, समाधानकारक कामगिरी , सर्व नियम आणि अटींचे अनुपालन इ. बाबत पूर्तता करणे आवश्यक राहील.

6.3 दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, 2016 च्या कलम 51 नुसार "आयुक्त, दिव्यांग कल्याण" नोंदणीचे नुतनीकरण बाबत निर्णय घेतील .

**7. देखरेख आणि अहवाल**

7.1 संस्था वार्षिक कामगिरी अहवाल (APR) "आयुक्त, दिव्यांग कल्याण" यांना सादर करतील.

7.2 लेखा आणि लेखापरिक्षण केलेले विवरणपत्र दरवर्षी सादर करतील.

7.3 संस्थांची तपासणी वर्षातून किमान एक वेळेस करणे आवश्यक राहील.

**8.नोंदणी रद्द करणे:**

"आयुक्त, दिव्यांग कल्याण" संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र जर सदर संस्था दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, 2016 दिव्यांग व्यक्ती हक्क नियम, 2017 व महाराष्ट्र राज्य दिव्यांग व्यक्ती हक्क नियम, 2024 चे, शासनाच्या नियमांचे उल्लंघन तसेच दिव्यांगांचे सक्षमीकरण न करणे तसेच खाली नमूदबाबीसाठी रद्द करू शकतील. जसे की,

1. न्यायालयाच्या किंवा शासनाच्या आदेशांचे उल्लंघन करणे.
2. नोंदणी प्रमाणपत्राच्या निकषांप्रमाणे सोयासुविधा उपलब्ध करून न देणे.
3. शासनाचा/ सार्वजनिक निधीचा/ CSR निधीचा अपव्यय किंवा गैरवापर करणे.
4. संस्थांमधील वाद व त्यामुळे लाभार्थी व प्रवेशितांना सोयीसुविधा उपलब्ध करून न देणे.
5. शासनाच्या निधी व्यतिरिक्त इतर स्त्रोतांमधून निधी संकलन करून संस्था आर्थिक दृष्ट्या सक्षम बनवण्या करिता प्रयत्न न करणे.
6. तपासणीमध्ये नागरी संस्थेने सादर केलेल्या वार्षिक कामगिरी अहवाल (APR) नुसार मोठ्या प्रमाणात त्रुटी आढळून येणे.
7. संस्थेमध्ये लाभार्थी किंवा कर्मचाऱ्यांचे लैंगिक शोषण किंवा बाल अत्याचाराची घटना घडणे.

**9. अपील :**

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, 2016 च्या कलम 53 आणि महाराष्ट्र राज्य दिव्यांग व्यक्ती हक्क नियम 2024 च्या नियम 7(1) नुसार नोंदणी नाकारणे किंवा रद्द करणे या विरुध्दचे अपील आदेश दिनांकापासून 30 दिवसांच्या आत, “अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव दिव्यांग कल्याण विभाग” यांच्याकडे दाखल करणे आवश्यक राहील.

**10. संस्थांची माहिती (Database) :**

सर्व संस्थांची माहिती संकलन करणे व (Database) तयार करून जतन करण्याची आणि वेळोवेळी अद्ययावत करण्याची जबाबदारी “आयुक्त, दिव्यांग कल्याण” यांची राहील.

11. सदर शासन निर्णय मानसिक आरोग्य अधिनियम, 1987 नुसार नोंदणी केलेल्या संस्था, तसेच शासकीय संस्था यांना लागू होणार नाही.

12. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, 2016 च्या कलम 49-53 अनुसार दिव्यांगांच्या कल्याण, आरोग्य, विकास, पुनर्वसन आणि सक्षमीकरण क्षेत्रात काम करणाऱ्या नागरी समाज संघटनांची/संस्थांची नोंदणी अनिवार्य आहे. कोणतीही व्यक्ती अथवा नागरी समाज संघटना/संस्था दिव्यांग क्षेत्रात वैध नोंदणी शिवाय कार्य करू शकत नाही. वैध नोंदणी शिवाय कार्यरत नागरी समाज संघटना/संस्था निदर्शनास आल्यास त्यांच्यावर दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, 2016 व इतर अनुषंगिक कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२५१०१७१५५६०७१४३५ आहे . हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

TUKARAM H MUNDHE

Digitally signed by TUKARAM H MUNDHE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PDWD, 2.5.4.20=D60C97125DD88B1F415C73CDEF592D0F67518BBD8BA278837219A7B9D7324AEC, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=57B59F48D85074D9EA4B3BACF05E19E7030E9F2B74772901E229A4BAE0497214, cn=TUKARAM H MUNDHE
Date: 2025.10.17 15:57:27 +05'30'

**( तुकाराम मुंढे भा.प्र.से. )**
**सचिव , महाराष्ट्र शासन**

**प्रति ,**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल,मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय मुंबई.
३) मा. उपमुख्यमंत्री ( वित्त विभाग व नियोजन विभाग) यांचे सचिव, मंत्रालय मुंबई.
४) मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास विभाग ) यांचे सचिव, मंत्रालय मुंबई.

५) मा. विरोधी पक्ष नेता, विधानसभा/विधान परिषद, विधानमंडळ, मुंबई.
६) मा.विधानसभा/विधान परिषद सर्व सदस्य, विधानमंडळ सचिवालय, मुंबई
७) मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
८) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मुंबई
९) आयुक्त, दिव्यांग कल्याण, आयुक्तालय, पुणे
१०) सर्व जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय
११) सर्व आयुक्त, महानगरपालिका
१२) सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण कार्यालय.
१३) सहाय्यक आयुक्त, मुंबई शहर / मुंबई उप नगर.
१४) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१५) सर्व समाज कल्याण अधिकारी,जिल्हा परिषद
१६) भारतीय जनता पार्टी,महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.बॅरेक नं.१,योगक्षेमसमोर, वसंतराव नाईक चौक, नरिमन पॉईन्ट, मुंबई ४०० ०२१,
१७) इंडियन नॅशनल कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश, कॉंग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई ४०० ०२५,
१८) राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी, राष्ट्रपती भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग,नरिमन पॉईन्ट,मुंबई ४०००२१,
१९) शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई ४०० ०२८,
२०) बहुजन समाज पार्टी, महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी,मुंबई ४०००१३,
२१) भारतीय कम्युनिस्ट पार्टी,महाराष्ट्र कमिटी जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस,वरळी, मुंबई
२२) भारतीय कम्युनिस्ट (मार्क्सवादी) पार्टी, महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई
२३) महाराष्ट्र नवनिर्माण सेना, राजगड, मातोश्री टॉवर, शिवाजी पार्क, दादर, मुंबई - ४०० ०२८,
२४) निवड नस्ती/दिव्यांग कल्याण-२.